# लोकसाहित्याच्या नव्या दिशा

**संपादक**
डॉ.नवनाथ अंगद शिंदे
सिद्धार्थ लांडे
ज्योत्स्ना खंडागळे

शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

- Loksahityachya Navya Disha
  Dr. Navanath Shinde
  Siddharth Lande
  Jyotsna Khandagale

**लोकसाहित्याच्या नव्या दिशा**
डॉ. नवनाथ शिंदे
सिद्धार्थ लांडे
ज्योत्स्ना खंडागळे


© **सर्व हक्क सुरक्षित**


- प्रकाशक
  सुमती लांडे
  शब्दालय प्रकाशन,
  वॉर्ड नं.७, श्रीरामपूर
  फोन : ०२४२२-२१०४४४
  मोबा. : ९८२२५२५४४४,
  ९८२२००८७९६

- प्रकाशन क्रमांक : ७००

- पहिली आवृत्ती : ऑगस्ट २०२३

- मुखपृष्ठ :

- अक्षरजुळणी
  अक्षर कॉम्प्युटर्स, श्रीरामपूर

- डीटीपी :
  ज्योत्स्ना खंडागळे

- मुद्रितशोधनः
  सिद्धार्थ लांडे

- मुद्रक
  समर्थ प्रिंटर्स, पुणे

- मूल्य : ३७०/- रुपये

# अनुक्रमणिका


| अ.नं. | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १. | लोकसाहित्य संशोधनातील वाटा आणि वळणे : उद्घाटनपर भाषण | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| २. | लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशाः बीजभाषण | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले |
| ३. | लोकसाहित्याच्या नव्या दिशा | डॉ. मुकुंद कुळे |
| ४. | लोकसाहित्यः काही निरिक्षणे | डॉ. मनोहर जाधव |
| ५. | वर्तमान काळातील लोकसाहित्याच्या संशोधनाची प्रस्तुतताः काही विचार | डॉ. सुधाकर शेलार |
| ६. | लोकसाहित्य आणि सद्यःस्थिती | डॉ. प्रभाकर देसाई |
| ७. | लोकगीतातील भलरीचे वेगळेपण | डॉ. शिरीष लांडगे |
| ८. | अंधश्रद्धा लोकसाहित्याचा गळा घोटते तेव्हा | डॉ. तुकाराम रोंगटे |
| ९. | लोकगीतेः काही निरिक्षणे | डॉ. मनोहर जाधव |
| १०. | कलेतले लोकतत्त्व | मंगेश नारायणराव काळे |
| ११. | मिथक संकल्पना व मिथक चिकित्सा | डॉ. अशोक राणा |
| १२. | राजा शिवछत्रपती निर्मित श्रीसप्तकोटेश्वर मंदिरातील संस्कृत शिलालेख | डॉ. विनय मडगावकर |
| १३. | जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील नवरात्रोत्सवाचे स्थित्यंतर आणि सांस्कृतिक प्रभूत्व | मेघना मराठे |
| १४. | लोकसाहित्यातील विद्रोही जाणिवा | डॉ. कृष्णा इंगोले |
| १५. | साठोत्तरी कवितेतील मिथकेः सामाजिक-सांस्कृतिक जीवनजाणिवांचा आविष्कार | डॉ. कविता मुरूमकर |
| १६. | चांदवड परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांतील पुरूष प्रतिमांचे वाचन | डॉ. अरूण ठोके |
| १७. | लोकसाहित्याच्या नवधारा | डॉ. नवनाथ अंगद शिंदे |

# चांदवड परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांतील पुरुष प्रतिमांचे वाचन

-डॉ. अरुण ठोके

**प्रास्ताविकः**

चांदवड परिसरातील लोकगीतांत प्रदेश विशिष्टता स्पष्टपणे जाणवते. चांदवडला नैसर्गिक सौंदर्य बहाल करणारे डोंगर, होळकरांचा रंगमहाल, चंद्रेश्वर ऋषी आदी स्थानिक विशेष लोकगीतांचे विषय बनले आहेत. त्याशिवाय शंकर, राम, विठ्ठल, हनुमान यासारख्या देवता, हरिश्चंद्र, पांडव आदी थोर पुरुषही लोकगीतांच्या रचनांना प्रेरक ठरलेले दिसतात. स्त्रिया डोंगर, सूर्य, चंद्र, आकाश, पाऊस यासारख्या निसर्ग घटक व घटितांना आस्था विषय बनवून लोकगीतांच्या आशयाची व्याप्ती वाढवतात. आपल्या भूप्रदेशाचे वेगळेपण दर्शवणारी भाषा आणि अभिव्यक्ती या पातळीवरही ही लोकगीते आपले स्वतंत्र अस्तित्व दर्शवितात. मौखिक परंपरेमुळे लोकगीतांच्या आविष्कारांत उच्चारणसुलभता व रचनासुलभता आढळते. चांदवड परिसरातील शेती पावसावर आधारित आहे. स्त्रिया घरातील कामे करून पुरुषांच्या बरोबरीने शेतातील कष्टाची कामेही करतात. पुरुष हे कुटुंबप्रमुख किंवा कारभारी असल्याने स्त्रिया त्यांच्यावर अवलंबून असल्याचे दिसते. मौखिक परंपरेने जतन केलेल्या लोकगीतांत पुरुषांच्या विविध रूपांचे चित्रण दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधात चांदवड परिसरातील स्त्रियांच्या कुटुंबातील वा जवळच्या नात्यातील पुरुषांच्या प्रतिमांचे आकलन करून घेतले आहे. यावरून तत्कालीन समाजातील स्त्रियांचे स्थान कळते. या परिसरातील स्त्रियांनी परंपरेने चालत आलेले पुरुषी वर्चस्व स्वीकारले आहे किंवा नाही, स्वतःच्या अस्तित्त्वाची जाणीव व्यक्त केली आहे किंवा नाही, आपले दुःख कशा प्रकारे व्यक्त केले आहे? यांसारख्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेणे महत्त्वपूर्ण ठरेल.

पुढील भागात आपण चांदवड परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांतील पती, दीर, भाया, सासरा, भाऊ, मुलगा व जावई या प्रमुख पुरुष प्रतिमांचा अन्वयार्थ लावू.

**१. पतीची प्रतिमा:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या प्रारंभी चांदवड परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांतील 'पती'ची प्रतिमा कशा प्रकारे चित्रित झाली आहे, तिचा शोध घेवू. ग्रामीण भागातील स्त्रिच्या दृष्टीने पती-पत्नी हे नाते पवित्र मानले जाते. एकमेकांविषयीची आत्मियता या नात्याला अधिकच दृढ करते. खालील लोकगीतातील पतीकडे कुटुंबातील सर्वच जबाबदारी असते. तो ती सक्षमपणे सांभाळतोय.तिच्याकडे छोटी-छोटी कामे आहेत. त्याचे कुटुंबातील स्थान व स्वतःचे दुय्यमत्व स्वीकारून आपल्या पतीविषयी भाबड्या अभिमानाने ती म्हणते-

*माझ्या चुडीयाची डोंगरावाणी भूज*
*यांच्या सावलीला उभी रायली सहज*

येथे पतीच्या बाहूंना डोंगर अशी उपमा वापरल्याने डोंगराचे सारेच चांगले गुण तिच्या पतीत असल्याचे सूचित होते. पशू-पक्षी ते देव या सर्वांचे आश्रयस्थान किंवा विश्रांतीस्थळ

डोंगर आहेत, जे सर्वांनाच प्रिय आहेत आणि त्यांच्यापुढे इतर सर्व छोटे दिसतात. या बाबीतून ती आपल्या पतीच्या सामर्थ्याचा निर्देश करतेय हे ध्वनीत होते. तिच्या जीवनात कष्ट, दुःख कमी आहे व तिचे जीवन सुखकर आहे असा अर्थ दुसरी ओळ दर्शविते. आपल्या पतीच्या कर्तबगारीचा, कष्टाळूपणाचा अभिमान व्यक्त करताना ती म्हणते–

***मोठं माझं घर याला खांबोखांबी मोती***
***सुतार कारागीर हौशेदार माझे पती***

शेतात कष्ट करून आपला संसार मोठा करणारा पती मिळणे तिला भाग्याचे वाटते. तिच्या चेहऱ्यावरील आनंदी भाव तिच्या सुखाचे द्योतक ठरतात. तिच्याकडे पाहून इतर स्त्रिया म्हणतात–

***दारात उभी हसतऽ गं हिचंमुख***
***चावळती सया हिला भरतंऽरचं सुख***

अशी भाग्यवंत स्त्री तिच्या पतीचे सुख आपल्या माहेरी आईला सांगते–

***भरतंऽरचं सुख नार सांगती आईला***
***नक्कीच धोतर केली सावली दोहीला***

पतीचे आपल्यावरील प्रेम कसे आहे हे आपल्या मैत्रीणीला सांगतांना ती म्हणते–

***लंबे लंबे बाल गोरी पलंगाखाली गेले***
***भरतार आवडी मानाखाली गोळा केले***

असे मनस्वी प्रेम करणारा पती जर त्याच्या पत्नीला न सांगताच गावी गेलातर त्याची वाट पाहणेच तिच्या हाती उरते.त्याच्या आठवणींनी ती व्याकूळ होते.

***गेला कोण्या गावा माझ्या मनीचा मोहन***
***मोहना बिगर गोड लागंऽना जेवण***
***गेला कोण्या गावागावा जायाची सव नाही***
***सुकून गेले व्हट पाणी द्यावा शेजेबाई***
***गेला कोण्या गावा माझ्या नथीचा लोलक***
***अजून येईना धनी कुकाचा मालक***

पतीच्या नसण्याने तिला जेवण रुचकर लागत नाही. त्याच्या काळजीने तिचा जीव हुरहुरत राहतो. पतीला नथीचा लोलक ही उपमा अतिशय समर्पक आहे. लोलकाशिवाय नथीच्या सौंदर्याची महतीच शून्य होते. लोलक असतो म्हणून नथ सुंदर दिसते. तसे पती असतो म्हणून पत्नीचा कुटुंबात व समाजात मान असतो. हे सूचन प्रस्तुत उपमेतून होते. नथ हे सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. पतीच्या प्रेमळ वागण्याने परस्परांविषयीचा विश्वास दृढ झाला आहे. त्याने तिच्या भावनांचा आदर केल्याने शृंगारातील भयही दूर पळून गेले. पतीच्या जवळ बसण्यात लाज बाळगण्याचे कारण नाही हे सांगणारी स्त्री म्हणते–

***शेजाबाजावरी बसायाची काय लाज***
***चंदनी माझा चुडा सावली गहिराबाज***

वरील ओळींत पतीला चंदनाची उपमा देवून त्याच्या स्वभावाचे सूचन केले आहे. त्याच्याबद्दलचा विश्वासही व्यक्त केला आहे. असा विश्वास आणि प्रेम एखादीच्याच वाट्याला

येते. बहुतांश स्त्रियांचा त्यांच्या पतीविषयीचा अनुभव याहून निराळा असतो. एखादीचा पती संशयी असतो, एखादीचा कपटी असतो, मतलबी किंवा व्यसनी असतो. अशा पतीच्या वाईट स्वभावाचे किंवा सवयीचे वर्णन असे केले जाते-

*काळा मसाला जसा वांग्याच्या फोडीला*
*काय करू नारी याच्या जलम खोडीला*

वांग्याच्या भाजीला काळ्या मसाल्याशिवाय जशी चव येत नाही तसे त्याच्या वाईट सवयीशिवाय त्याचे जगणे नाही म्हणून कोणी स्त्री जर आपल्या पतीच्या सुखाचे गोडवे गात असेल तर तिला तिचा पती भोळा वाटतो. पण तो तसा नाही. हे अनुभवी व वयाने मोठ्या असलेल्या स्त्रिया सांगतात-

*नको म्हणू नारी भरतर भोळा भोळा*
*गारुडी येचंमतं केसानं कापी गळा*

पतीचे गोड-गोड बोलणे, वागणे पाहून त्याला भुलून भोळा म्हणू नये. जसा गारुडी सापाला पुंगी हलवून भूलवितो आणि दगा करून पकडतो. साप त्याच्या अखत्यारित आल्यावर सापाचे सामर्थ्य असलेले विषदंत तो काढून घेतो. त्यामुळे साप दुबळा होतो. मग हाच गारुडी त्याला पेटाऱ्यात बंदिस्त करून वेळेवर अन्न न देता, सापाची इच्छा नसतानाही त्याचा गावोगावी खेळ मांडून त्याच्या जीवावर पोट भरतो. जंगलातील स्वतंत्र साप गारुड्याच्या पारतंत्र्यात गेल्यावर जसे आपले अस्तित्वच विसरून जातो तसेच स्त्रीजीवनाचे होते. हे एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला समजावून सांगते. केसाने गळा कापणे यासारखा वाक्प्रचार वापरल्याने आणि पतीला गारुड्याची उपमा दिल्याने लोकगीतांतील कल्पनाशक्तीचा प्रत्यय येतो. नेहमीच त्रास देणाऱ्या पतीचे वर्णन असे येते-

*भरतरचं सुख कोण सांगते निलट*
*पेठारीचा नाग घडोघडीने उलट*

अशी पतीची वागणूक अनुभवणारी स्त्री तिचा पती तिच्यावर विश्वास दाखवणार नाही. आपण सांगितलेली एकही गोष्ट तो ऐकणार नाही. उलट पतीकडून होणाऱ्या त्रासाचे वर्णन विंचूदंशदाह किंवा सापाच्या दंशानंतरच्या दाहाशी तुलना करणारे आहे.

*नको म्हणू नारी भरतर आला हाती*
*इच्चाला नांग्या किती सापावाणी लहऱ्या येती*

पतीने मारले आणि पावसाने झोडपले तर दोनही घटना सारख्याच समजून जीवन जगावे . त्याची कुणाकडे तक्रार करता येत नाही. वरील वाक्प्रचारातून स्त्रियांवर होणारा अन्याय कसा दडपला जायचा याची कल्पना येते. एखादा पती त्याच्या पत्नीला हाणमार करतोय हे दिसत असताना पती-पत्नीच्या भांडणात आपले काय काम? यासारख्या वाक्प्रयोगतूनही तोच अर्थ दर्शविला जातो. मात्र पतीच्या हाताने बसणाऱ्या मारापेक्षा शब्दांच्या माराचे ओरखडे तिच्या हळव्या मनावर खोलवर उमटतात. ती ते दुःख असे व्यक्त करते-

*काय बोललास माझ्या गहीन मनाला*
*लागलं बट्टा तुझ्या शहानपनाला*
*तुझ्या बोलण्यानं मन माझं रे इटलं*
*या वाऱ्याच्या नेटानं पान केळीचं फाटलं*

पतीने तिचे मन दुखावल्याने त्याच्या शहाणपणाचा ती निषेध करते. ज्याप्रमाणे वाऱ्याने केळीचे पान फाटून जावे आणि वाऱ्याला त्याची तमाही नसावी त्याप्रमाणे पतीचे वागणे आहे. त्याचे हे वागणे पाहून ती त्याला असे म्हणते–

*बोलशी बोलक्या तुझे बोलायचे दिस*
*या आंब्याला कईऱ्या नही येती बारुमास*

वरील ओळींतून तिला कुटुंबात स्थैर्य (मुलबाळ) नसावे हे समजते. मुलबाळ झाले की आपल्याला सुखाचे दिवस येतील या आशेवर ती जीवन जगत राहते.

**२. दीर, भाया व सासरा यांची प्रतिमा:**

पूर्वी एकत्रित कुटुंबपद्धती असे. स्त्रियांसाठी घरातील पुरुषांत दिराचे नाते कधी प्रेमाचे, थट्टेचे तर कधी दरारा निर्माण करणारे, पुरुषी वर्चस्व दाखविणारे असे चित्रित झाले आहे. भावजई व दीर यांची मैत्री होण्याचे कारण असे की दीर लहान आहे. त्याच्यात तिला आपला लहान भाऊ दिसतो. दीर घरी असेल तर गप्पा–गोष्टींत दिवस कसा जातो हे कळत नाही.

*हसून खेळून दिस गेला मावळाया*
*दीर पाटील गं होते चावळाया*
*धाकला देर बाई माझ्या भावापरमानं*
*गावा गेला कालदेर बाई माला करमंनं*

दीर बाहेरगावी गेल्याने भावजाईला घरात करमत नाही. ती गर्भार असल्याने तिला अनेक पदार्थ खावेसे वाटतात. त्यातल्या त्यात कवठ खाण्याची तीव्र इच्छा होते. तिने आपल्या दिराला सांगताच दिराने कमी वेळेत कुठून कवठ आणून दिले हे कळले नाही.

*खाऊशी वाटलं इंद्रबनीचं कऊट*
*देर पाटील यांनी पैदा केलं कुठं?*

दिरासाठी मोठ्या भावाची पत्नी आईच्या ठिकाणी असते. आईप्रमाणे ती आपल्या दिराला जीव लावते. आईच्या हक्काने दिराला काम सांगते तो ऐकतोही, मात्र घरातील इतरांना ते पटणार नाही. हे तिला ठाऊक असते.

*धाकल्या देराला काम सांगते चोरून*
*वसरीतला तांब्या आणा दादाजी भरून*

वरील ओळींतून हेही सूचित होते की, घरातील कामे ही फक्त घरातील स्त्रियांनीच करावीत. त्यांनी ती पुरुषांना सांगू नयेत. त्यातून पुरुषी वर्चस्व टिकवून स्त्रियांच्या श्रमांचे दुय्यमत्त्व दर्शविले जाते. परंपरेने दीर भावजई यांना परस्परांची थट्टा–मस्करी करण्याचा आधिकार दिलेले आहेत.

यावरही काही रंजक लोकगीते आहेत. त्यातून विनोदनिर्मिती केली जाते. केसांत कोंडा पडून डोक्यात खवले झालेल्या दीराला उद्देशून रचलेले हे लोकगीत पहा-

*पंढरी जत्रा जाया अडवं लागतं सारूळऽ*
*खऊडेचं डोकं वर तुपाचं थारूळ ऽ*

असे परस्परांच्या व्यक्तिमत्त्वातील दोष हेरून त्या आधारे विनोदनिर्मिती केलेली दिसते. वरील ओळींत दिराच्या डोक्यातील खवल्यांना तुपाच्या थारोळ्याची उपमा दिल्याने अतिशयोक्ती अलंकार साधला आहे.

भावजईशी मैत्री करणारे, प्रेमाने वागणारे दीर काही सर्व स्त्रियांच्या नशीबी नसतात. एखादीच्या सासुरवासात दीर-भायांचाही वाटा असतो. तो त्रास तिला सहन करणे भाग पडते. माहेरी हे भावाला माहीत झाले तरी त्याने सोयऱ्यांशी गोड राहावे असे तिला वाटते.

*बोलत्या गं देर भाया बोलत्या माझी मला*
*भाऊ तरी माझ्या सोयाऱ्याशी रहायभला*

तिच्या मनातील दीर भायांविषयीची भीती अशी व्यक्त होते. तिच्याशी त्यांचे वागणे उर्मटपणाचे, वर्चस्वी वृत्तीचे असते. त्यामुळे कोणी शेजारची स्त्री घरात आल्यावर मोठ्याने बोलत असेल तर तिला खालील प्रमाणे आपल्या घरातील कायदे कानून सांगते.

*दीर-भाया यांचा मोठा सरकारी कायदा*
*अवो सिताबाई हळू बोलावा बायजा*

स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांवर (मोठ्या आवाजात बोलण्यावरही) बंदी घालून पुरुषांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे बंदिस्त करून टाकले होते याची कल्पना येते.

वर्षातून एकदा येणाऱ्या भाऊबिजेसाठी दिवाळीचा मुळहारी भाऊ येईल. पण सोंगणीचे कारण सांगून दीर तिला माहेरी जाऊ देणार नाही. हे तिला आधीच उमगते.

*दिवाळी दसरा माझा सोंगणीचा पसारा*
*बोलतील देर वहिनी माहेर इसरा*

सासरच्या नात्यातील 'सासरा' हे एक नाते आहे. चांदवड परिसरातील लोकगीतांत साससऱ्याविषयी किरकोळ उल्लेख आढळतात. तिच्या सासऱ्यांनी ओट्यावर बैठक मांडली आहे. त्यांच्या समवेत अन्य लोकही ओट्यावर बसले आहेत. तिचे सासरे गावातील प्रतिष्ठित पाटील आहेत, हे ती लहान जावेला दर्शवितांना म्हणते-

*जावगं मीरा झाड वट्टयाची पायरी*
*सासरे पाटील सभा बसली बाहेरी*
*जाव गं मिरा झाड वट्टयाची कंगणी*
*सासरे पाटील सभा बसली अंगणी*

वरील लोकगीतातून या स्त्रियांनी त्यांच्या सासऱ्याचे गावातील स्थान सांगितले आहे. त्यावरून त्याचे समाजातील प्रतिष्ठित स्थान समजते.

**३. भावाची प्रतिमा:**

स्त्रियांसाठी सासर हे शारीरिक कष्टांनी थकविणारे आणि मानसिक ताणांनी भरलेले ठिकाण असते. सासरी शरीराला विश्रांती नाही की मनाचा ताण हलका होत नाही. शरीराला विश्रांती देणारे आणि मनाला हलके-फुलके करणारे एकमेव ठिकाण म्हणजे माहेर होय. त्यामुळे स्त्रियांना आपल्या माहेरचे कुणीही भेटले तरी आनंद होतो. सासरला जाच होत असला तरी नुसत्या माहेरच्या आठवणीनेही मनाला गारवा मिळतो. आई, वडील, बहिण, भाऊ ही नाती तिला दुःखप्रसंगी साथ देतात. स्त्रियांच्या पारंपरिक मनाला तर भावाचे अत्यंत कौतुक आहे. गरीब का असेना परंतु बहिणीला भाऊ असावा. भावाने त्याच्या कुवतीनूसार जी चोळी-बांगडी केली असेल ती आनंदाने स्वीकारावी हे सांगणारे खालील गीत पहा-

*दुबळा-पाबळा भाऊ बहिणीला असावा*
*बांडी-भुरकी चोळी एका रातीचा ईसावा*

सासरच्या कष्टांतून एका रात्रीपुरती का होईना विश्रांती माहेरी मिळते. बहिणीच्या हृदयात भावाचे स्थान दिसून येते ती म्हणते-

*जात्याच्या गं पाळी पीठ पडे लोण्यावाणी*
*बहिणीला भाऊ अपरूक सोन्यावाणी*

भावाचे कौतुक गाणाऱ्या ओव्या ती गाते तेव्हा जात्यातून पडणारे पीठ अत्यंत मऊ दळले जाते. एक प्रकारे हा भावाच्या नावाचा महिमाच. अशा भावाला दिलेली सोन्याची उपमाही फारच बोलकी आहे. ज्याप्रमाणे सोन्याच्या शुद्धतेची पुरेपूर खात्री असते, ते गंजत नाही आणि मौल्यवान असते. त्याप्रमाणे आपला भाऊ आहे असे तिला वाटते. बहीण भावंडांचे तर खूपच सुंदर वर्णन केले आहे .

*बहीणभावंड एका भाकरीचा काला*
*तुझा माझा जल्म एका हिरीदात झाला*

अशी भावूक वर्णने अनेक लोकगीतांत आढळतात. चांदवड परिसरातील खेड्यांमध्ये जवळील गावातच सोयरिक करण्याची परंपरा आहे. काही ठिकाणी तर गावातच वेगळ्या कुळातील लोकांशी सोयरिक केली जाते. अशा वेळी जवळच माहेर असलेली बहीण दुपारच्या वेळी आपला कामधंदा आटोपल्यावर माहेरी जाते.

*दुपारच्या भरी घेते कावडलोटून*
*जवळमाहेर येते भावाला भेटून*

आपला भाऊ वारकरी आहे. आषाढ महिन्यात पंढरपुरच्या विठ्ठलाची यात्रा असते. त्यावेळी एकादशीचा उपवास करून भाऊ रिंगणात घोडा नाचवितो. हा अभिमान व्यक्त करताना ती तिच्या मैत्रिणींना म्हणते-

*आयांनो बायांनो चला आखाडी पाह्याला*
*रामाचेपवाडे भाऊ लागले गायाला*
*सयाला सया पूसंऽ आखाडी कोण्या दिशी*
*भाऊनं नाचवली घोड्यावरी एकादशी*

वरील लोकगीतातील बहिणीला आपल्या भावाच्या सदाचाराचे कौतुक वाटते. मावळतीला सूर्य जाऊन अंधारून आले तरी भावाच्या चालण्यावरून ती त्याला सहज ओळखू शकते.

खालील लोकगीत एका बहिणीने तिच्या भावाच्या व्यभिचारी वृत्तीकडे लक्ष्य वेधले आहे. भाऊ नाचणाऱ्या स्रीकडे जातो मात्र त्याच्या या कृतीचे सांत्वन ती अशी करते-

*नाचणीच्या घरी भाऊ जातो कवा मवा*
*ईसरून आला काच्या कंबरीचा नावा*
*मोहऱ्या नारीनं भाऊ केला माझा येडा*
*सोडी कंबरबंग घेती रुमालाचा झाडा*

भाऊ नाचणाऱ्या स्रीकडे जातो 'कवा- मवा' म्हणजे कधी -कधीच, नेहमी नाही. त्याचे तिथे जाणे हा दोष असूनही ती त्याकडे दुर्लक्ष करते. तिच्यावरील पुरुषी वर्चस्वाचे संस्कार तिला स्वतंत्र दृष्टी देऊ न शकल्याने ती भावाला दोष देण्याऐवजी नाचणाऱ्या स्रीलाच दोष देते. तिचे भावाबद्दल एवढे प्रेम असण्याचे कारण की तो बहिणीचा कैवार घेतो. भाऊ बहिणीच्या गावी जातो. नदीकाठी असलेल्या इतर सासुरवाशिणींना त्याच्या बहिणीची खुशाली विचारतो. तिला होत असलेला सासुरवास ऐकून त्याचा जीव हळहळतो. नदीकाठी पाणी पिण्यासाठी उपसलेला झरा सोडून तहानलेलाच निघतो. हे पाहून इतर स्रियांना अप्रूप वाटते. त्या म्हणतात-

*बहिणीचा सासुरवास भावाच्या गं कानी गेला*
*उपसिला झिरा भाऊ पाणी नही पेला*

भाऊ बहिणीच्या घरी जातो. सोयऱ्यांना त्याच्या बहिणीला होणाऱ्या त्रासाची विचारणा करतो. सोयरे वेडी वाकडी अपमानकारक भाषा वापरतात. बहिणीला हे पाहून वाईट वाटते. तिच्या भावाची समजूत काढताना ती त्याला म्हणते-

*सोयऱ्याचे बोल कडू भोपळ्याचे येल*
*आपल्या बहिणीकरिता दादा रउंदळीत चाल*

जशी कडू भोपळ्याच्या वेलांनाकाही मोल नाही तसे सोयऱ्याचे बोल आहे. असे बहीण भावाला समजावते. एखाद्या बहिणीचा भाऊ स्वभावाने कडक असतो. बहिणीचा सासुरवास कळताच तिच्या सासरच्या लोकांना रागावतो आणि आपल्या बहिणीची बाजू घेतो. तेही नरम पडतात.

*तरुटाचं फुल करी डगऽ मग*
*सोयऱ्याची रग मोडी माझा वाघ*

असा भावाविषयीचा अभिमान अनेक लोकगीतांतून वेगेवेगळ्या प्रकारे प्रकट झालेला आहे. बहीण माहेरी गेल्यावर ती भाऊ व भावजईच्या वागण्यातील फरक ठळकपणे नोंदवते.

*भावजई बाई पायानं पिढं लोटी*
*पाठच्या बंधुसाठी अन्याव घातला पोटी*
*भावजई बाई उगीर तुझा बोल*
*भाऊ तरी माझा आडाचं पाणी खोल*

भावजईच्या अशा अपमानकारक व विपरीत वागण्याकडे पाहून बहीण भावाच्या चांगल्या वागण्याचे दाखले देते. तिचा भाऊ जागेवरून उठून स्वतःच्या हाताने पाणी पिल्यामुळे बहिणीला राग येतो. यासारख्या वर्णनांवरून तत्कालीन स्त्रियांच्या मानसिकतेची, कौटुंबिक वातावरणाची कल्पना येते. बहीण-भावंडातील प्रेमाची कल्पना येते.

**४. मुलाची प्रतिमा:**

निसर्गाने स्त्रीला मातृत्त्व हे एक वरदान दिले आहे. त्यामुळे समाजनिर्मिती होऊ शकली. स्त्री पुरुष हे समाजाचे अभिन्न अंग आहेत. मात्र पुरुषप्रधान संस्कृतीची परंपरा निर्माण झाल्यामुळे पुत्रप्राप्तीला अनाठायी महत्त्व प्राप्त झाले. मुलालाच वंशाचा वारस मानले जाऊ लागले. अनेक चुकीच्या समजुती रूढ झाल्याने पुरुषांचे वर्चस्व वाढत जाऊन स्त्रियांचे शोषण होत राहिले. मुलगा झाल्याचा आनंद आणि त्याचे गोडवे गाणारी अनेक लोकगीते आहेत .

स्त्री मुलाला नऊ महिने पोटात वाढवते. त्याच्या जन्मानंतर मोठा होईपर्यंत त्याचे नेटके संगोपन करते. मुलगा मोठा झाल्यावर त्याच्या मनाला पटेल तसे तो वागू लागतो. त्याला त्याच्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव करून दिली जाते.

*नऊ महिने होता होता आमदारशाहीला*
*बाबा या बयांन याला उजेड दायीला*
*मावलीन पुतंऽपुतं वागविला लोला*
*आला जानेमंधी परऽफुटलेच त्याला*

मुलगा लहान असेपर्यंत आई वडिलांची काही तक्रार नसते. तक्रार सुरु होते ती त्याच्या लग्नानंतरच. लग्नानंतर त्याला आपली पत्नी प्रिय वाटू लागते. आई वडिलांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. अशातच सासू सुनेचे भांडण झाले तर मुलगा आपली बाजू न घेता सुनेची बाजू घेतोय हे पाहिल्यावर आई म्हणते-

*नको म्हणू पुता मावलीला केगामती*
*तुला जल्म दिला तवा अस्तुरी कुठं होती?*
*नको म्हणू पुता मावलीला सोंगा सोंगा*
*तुला जल्म देता जीवाची झाली गंगा*
*नको करू पुता मावलीची दुरदशा*
*मांडीवं घेऊन फार केली तुझी आशा*

मुलाला लहानचे मोठे केले. त्याच्यासाठी घर बांधले, शेती-बाडी जमवली. त्याने आपल्या पत्नीचे ऐकून आईचे जे हाल केलेत त्याचे दुःखद वर्णन येथे केले आहे. मुलाकडून अपेक्षाभंग झाल्याने आई-वडील दुःखी होतात.

*नऊ महिने पोटी नऊ महिने पाठी*
*नही कामंआला बाबा बयेला शेवटी*

म्हातारपणातही कष्ट करून पोट भरणाऱ्या आई वडिलांचे असे भावूक वर्णन येते. तर अन्य एका ठिकाणी मुलगा आई-वडिलांतून बाजूला निघून कसा वागतो ते पाहू-

*वागवलापुतंऽ आंगाच्या चिंध्यामधी*

*आला जानेमंधी झाला भाऊबंदी*

मुलाच्या अशा विपरित वागण्याचे संदर्भ हे समकालीन जीवनातील सामाजिक वास्तवाकडे लक्ष वेधतात. वरील लोकगीतातील तपशील खेड्यातील तुटू लागलेल्या कुटुंबसंस्कृतीचे निदर्शक आहेत.

**५. जावयाची प्रतिमा:**

आपल्या परंपरेत मुलीच्या नवऱ्याला म्हणजे जावयाला फारच मान दिला जातो. त्या तुलनेने मुलीचे किंवा सुनेचे महत्त्व कमीच आहे. लग्न वा तत्सम समारंभात जावयाच्या मानपानाकडे बारकाईने लक्ष दिले जाते. मुलीला साजेसा वर शोधण्यासाठी प्रत्येक आई-वडील प्रयत्न करतात . 'सून पहावी सासऱ्याने आणि जावई पहावा सासूने' असे वाक्य प्रचलित आहे. मात्र प्रत्यक्ष लग्न समारंभ जमवण्यापासून मुलगा-मुलगी पाहण्याचे सर्व कार्यक्रम पुरुषमंडळीच पार पाडतात. त्यात स्त्रियांची भूमिका अल्पशी असते, असे चित्र ग्रामीण भागात दिसते. मात्र एखादा अपवाद असाही असतो-

*जावई पहिला गं आपल्या डोळ्यानं*
*बाई तरी माझी मोहर मोजली तोळ्यानं*

आपली मुलगी सुंदर असल्याने तिच्यासाठी तसाच सुंदर वर शोधणाऱ्या स्त्रीचा हा अनुभव आहे. आपल्या जावयाचे वागणे अतिशय चांगले असल्याने ती त्याला सोन्याची उपमा देते. आपल्या मुलीच्याही गुणांचे कौतुक करतांना ती म्हणते-

*जावई सोनं लेक बिजलीची बत्ती*
*यिच्या उजेडानं जावई पोथी वाची*

मुलगी व जावयाच्या सुखी, आनंदी संसाराचे हे सुरेख वर्णन आहे. अशी वर्णने क्वचित आढळतात. पूर्वी अनेक अनिष्ट रूढी-परंपरा होत्या. लग्नानंतर काही मुलींच्या वाट्याला सासुरवास येई. तो सासुरवास नवऱ्याचा आहे हे तिच्या आईला समजल्यावर ती म्हणते-

*जावयाची जात मठा-मुंगाची पेरणी*
*बाई आपली देऊन यांची उगीर बोलणी*
*जावयाची जात बेईमान सांगती*
*बाईला गं माझ्या लेक रंभाला गांजती*
*गोरी माझी बाई काळी कशानं पडली*
*येड्या गबाराची याची संगत घडली*

जावयाची वागण्याची रीत काही योग्य नाही. मठ, मूग पेरणे जसे अवघड तसे मुलीला याच्याशी वागणे अवघड जाते.

**सारांश-**

प्रस्तुत शोधनिबंधात चांदवड परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचे संकलन करून त्यातील पती, दीर, भाया, सासरा, भाऊ, मुलगा व जावई या पुरुष प्रतिमांचे वेगळेपण मांडलेले आहे. याशिवाय या परिसरातील लोकगीतांत अन्य ठिकाणच्या लोकगीतांत आढळणाऱ्या बाप, मेहुणा,

नणंदेचा पती, पुतण्या किंवा इतर नात्यातील सोयरे, गावातील अन्य व्यवसाय करणारे पुरुष यांचेही तुरळक उल्लेख दिसून येतात.

एकंदरीत चांदवड परिसरातील वरील लोकगीतांतून स्त्रियांनी पुरुषांचे जे आकलन करून घेतले आहे, त्यात भाऊ हे नाते सोडले तर अन्य नात्यांतील पुरुषांविषयी फारसा विश्वास दिसून येत नाही. परंपरेने स्त्रियांवर लादलेले पुरुषप्रधान संस्कृतीचे संस्कार स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे शोषण करीत आहेत. ही जाणीव स्त्रियांना झाली आहे. ग्रामीण भागात अजूनही शिक्षणाचा पुरेसा प्रसार न झाल्याने स्त्रिया अनिष्ट रुढींचे ओझे आपल्या खांद्यावर घेऊन जीवन जगत आहेत, असे आढळून येते .

**(पूर्वप्रसिद्धीः सदर लेख 'रिसर्च जर्नी' या ऑनलाईन नियतकालिकात जुलै २०१८ मध्ये प्रकाशित झालेला आहे.)**

*-*-*